DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301

Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 17.04.2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 19.04.2020.
6. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26

दिनांक:-07 /05/2020.

**विषय:- उस्मानाबाद जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्गालगत असलेले धाबे चालू करणेबाबत.**

**आदेश:-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 6 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 17 मे 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. यातील मुद्दा क्र. 10 मध्ये असे नमूद केले आहे की, राज्य शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश व मार्गदर्शक सूचनांनुसार परवानगी देण्यात आलेल्या बाबी त्यामध्ये नमूद केलेल्या प्रतिबंधांसह चालू राहतील.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 चे महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार संदर्भ क्र. 5 अन्वये या कार्यालयाने आदेश निर्गमित केले असून या आदेशातील मुद्दा क्र. 9 (7) नुसार राज्य शासनाने निर्धारित केलेल्या किमान अंतराच्या अधीन राहून महामार्गावरील ट्रक दुरुस्तीची दुकाने (गॅरेज), धाबे सुरु राहतील असे नमूद केले आहे.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त अधिकारांनुसार करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता शासनाकडून करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत **उस्मानाबाद जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गांवरील व राज्य महामार्गांवरील धाबे खालील अटी व शर्तीच्या आधारे चालू करणेस परवानगी देत आहे.**



Scanned by CamScanner

1. धाब्यावर असलेल्या स्वयंपाकगृहामध्ये वारंवार आवश्यक ती स्वच्छता व निर्जंतूकीकरण करणे बंधनकारक असेल. तसेच याठिकाणी काम करणा-या व्यक्तींनी वैयक्तिक स्वच्छता राखणे, मास्क, हॅण्डग्लोज, गॉगल, सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक आहे.
2. धाबा मध्ये पर्यावरणपूरक (Environment friendly) व नष्ट करता येऊ शकतील अशा (Disposable) प्लेट्स, ग्लास, बॉटल्स इ. चा वापर करावा.
3. वैद्यकीय निकषांनुसार निश्चित केलेले सामाजिक अंतराचे पालन करणे बंधनकारक असेल.
4. सामाजिक अंतराचे पालन होण्याचे दृष्टीने आवश्यक मार्कीग करण्यात यावे.
5. धाबा चालू ठेवणेसाठी वेळेचे बंधन असणार नाही.
6. धाब्यावर गर्दी होणार नाही यासाठी आवश्यक दक्षता घेण्यात यावी.
7. धाब्यावर जेवणासाठी येणा-या व्यक्तींना हात धुण्यासाठी सॅनिटायझर, साबण, पाणी इ. उपलब्ध करुन देण्यात यावे.
8. वेळोवेळी शासनाकडून व आरोग्य विभागाकडून देण्यात येणा-या सूचनांचे पालन करणे धाबाचालकावर बंधनकारक राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005 चे कलम 51 तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांका पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
4. सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, उस्मानाबाद.
5. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
6. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
7. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
9. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

7/5/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner